SMBT

# SMBT Hospital 1st Press Conference




SMBT



SMBT

पुढारी
www.pudhari.com

SMBT

# एसएमबीटीमध्ये क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रियेसाठी 'मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरी'

## एसएमबीटीमध्ये आठ वर्षांत २७ हजारांपेक्षा अधिक हृदयविकार शस्त्रक्रिया

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रियेसाठी 'मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरी' हा नवा पर्याय एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. 'मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरी ज्याला मिनिमली इनव्हेसिव्ह प्रोसिजर किंवा मिनिमली इनव्हेसिव्ह टेक्निकद्वारे शस्त्रक्रिया असेदेखील म्हटले जाते. या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने 'एसएमबीटी' शस्त्रक्रिया केल्या जात असून, त्याचा रुग्णांना मोठा फायदा होत आहे. कमी रक्तस्राव, इन्फेक्शनदेखील कमी होत असल्याने, रुग्णांना लवकर डिस्चार्ज देणे शक्य होत असल्याचे, हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विद्युतकुमार सिन्हा, एमएमबीटीच्या डीन डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेत, एसएमबीटीमध्ये २७ हजारांपेक्षा अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती दिली. हृदयविकार किंवा बायपास याबाबत अनेक समज-गैरसमज आहेत. शस्त्रक्रिया करावयाची असेल तर छातीवर मोठी चीर पाडावी लागते. रक्तस्राव खूप होतो, आपला रुग्ण बरा होईल की नाही, असे अनेक प्रश्न रुग्णाच्या नातेवाइकांमध्ये असतात. मात्र, एसएमबीटी हॉस्पिटलचे हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरीद्वारे अवघड असलेल्या शस्त्रक्रियादेखील यशस्वी करून दाखवत आहेत.

दरम्यान, एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये स्वतंत्र हृदयविकार विभाग कार्यरत आहे. हा विभाग एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट नावाने असून, हॉस्पिटलच्या सेंटर ऑफ क्लिनिकल एक्सलन्सचा भाग आहे. नवजात बालकांपासून ते अगदी वयोवृद्धांवर हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये उपचार व शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. शासकीय योजनेच्या माध्यमातून दर्जेदार उपचारांबरोबरच शस्त्रक्रियादेखील पूर्णपणे मोफत केल्या जात असल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.

**मिनिमली इनव्हेसिव्ह शस्त्रक्रियेचे फायदे :** इन्फेक्शनची शक्यता कमी, कमी रक्तस्राव, रुग्ण लवकर बरा होतो, रुग्णालयातून लवकर डिस्चार्ज, कमी वेदना, कमी व्रण,

Nashik Edition
Oct 2, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# हृदयविकारासाठी 'मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरी' पर्याय

## एसएमबीटी हॉस्पिटल; आठ वर्षांत २७ हजार शस्त्रक्रिया

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आठ वर्षांत २७ हजार शस्त्रक्रिया झाल्या असून, अतिशय क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रियांसाठी 'मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरी या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केल्या जात आहेत. यामुळे रक्तस्राव कमी आणि इन्फेक्शनदेखील कमी होते, अशी माहिती डीन डॉ. मीनल मोहगावकर यांनी दिली.

पत्रकार परिषदेत डॉ. मीनल मोहगावकर म्हणाल्या की, एसएमबीटी हॉस्पिटलकडून अद्ययावत तंत्रज्ञानाची कास धरून अनेक इनोव्हेशन्स करण्यात आले आहेत.



याचाच एक भाग म्हणून मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरीबाबत जनजागृती करण्याचा मानस ठेवला आहे. हृदयविकार किंवा बायपास याबाबत अनेक समज-गैरसमज आहेत. शस्त्रक्रिया करावयाची असेल, तर छातीवर मोठी चीर पाडावी लागते. रक्तस्राव खूप होतो. पण नव्या तंत्रज्ञानामुळे काही मिलिमीटर ते काही सेंटीमीटर आकाराच्या चिरा करून शस्त्रक्रिया होते. याआधी लप्रोस्कोपिक म्हणजेच पोटाचे किंवा गुडघा खुब्याचे दुर्बिणीद्वारे ऑपरेशन केलेले आपण ऐकले असेल. अशाच प्रकारची दुर्बिणीद्वारे हृदयविकार शस्त्रक्रिया आता एसएमबीटीमध्ये पार पडत आहेत. यावेळी हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विद्युतकुमार सिन्हा व चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे, हार्ट इन्स्टिट्यूट विभागप्रमुख डॉ. गौरव वर्मा, डॉ. सुरेश पाटील, डॉ. पवन सिंग, डॉ. महेश आहिरे उपस्थित होते.

पुण्य नगरी

SMBT

# हृदयविकारावर योग्य पर्याय 'मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरी'

## एसएमबीटीमध्ये २७ हजारांहून अधिक क्लिष्ट शस्त्रक्रिया; सर्वसामान्य रुग्णांवर मोफत उपचार

**नाशिक :** हृदयविकार म्हटला की, प्रत्येकाला भीती वाटणे साहजिकच आहे. योग्य वेळेत योग्य उपचार न मिळाल्यास क्षणात मृत्यूच्या दारात घेऊन जाणारा हा आजार आहे. याबरोबरच या आजाराच्या उपचाराबाबतही भीती असल्याने अनेक रुग्ण शस्त्रक्रियेलाही घाबरतात. मात्र, आता एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये 'मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरी'द्वारे हृदयविकार शस्त्रक्रिया हा एक नवा पर्याय उपलब्ध झाला आहे, अशी माहिती हॉस्पिटलच्या डीन मिनल मोहगावकर, तसेच हृदयविकार तज्ज्ञ डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी पत्रकार परिषदेत दिली.




जागतिक हृदय दिनानिमित्त एसएमबीटी हॉस्पिटलमार्फत अद्ययावत तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरीबाबत जनजागृती करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. हृदयविकार किंवा बायपास शस्त्रक्रिया म्हणजे छातीवर मोठी चीर पाडावी लागते. रक्तस्राव खूप होतो, आपला रुग्ण बरा होईल की नाही, यासह अनेक प्रश्न रुग्णांच्या नातेवाइकांना सतावतात. त्यामुळे बऱ्याचदा त्यांना आत्मविश्वास गमवावा लागतो. मुलींच्या लग्नासाठीदेखील मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. नव्या तंत्रज्ञानामुळे मोठ-मोठ्या उघड्या चिरांऐवजी मिनिमली इनव्हेसिव्ह सर्जरीद्वारे काही मिलिमीटर ते काही सेंटिमीटर आकाराच्या लहान चिरा करून शस्त्रक्रिया होत असल्यामुळे मोठा दिलासा देण्यात एसएमबीटी हॉस्पिटलच्या तज्ज्ञांना यश आले आहे. एसएमबीटी हॉस्पिटलच्या हार्ट इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून आतापर्यंत २७ हजारांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार झाले असून, या रुग्णांना नवजीवन मिळाल्याचे मीनल मोहगावकर यांनी सांगितले.

मिनिमली इन्वेसिव्ह सर्जरीद्वारे प्रचलित शस्त्रक्रियेच्या तुलनेत कमीत कमी जखम होते. परिणामी, रुग्णाचा रक्तस्राव कमी होतो व वेदना कमी होतात. इन्फेक्शन होत नाही. उत्तर महाराष्ट्रासह ठाणे, भिवंडी, पालघर, वाडा, विक्रमगड, बोईसर, मुरबाड, ठाणे, उल्हासनगर, कल्याण, बदलापूर, टिटवाळा परिसरातील रुग्णांचा एसएमबीटीकडे कल वाढला आहे. हॉस्पिटलचे डॉ. गौरव वर्मा, डॉ. विद्युतकुमार सिन्हा, डॉ. सुरेश पाटील, डॉ. पवन सिंग, डॉ. महेश आहिरे यांच्यासह कर्मचारी व डॉक्टर्स २४ तास रुग्णसेवा करत असल्याचे सांगण्यात आले. पत्रकार परिषदेस हॉस्पिटलचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे, जनसंपर्क अधिकारी दिनेश सोनवणे आदी उपस्थित होते.

### हॉस्पिटलची वैशिष्ट्ये

■ एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ९१० बेड्सचा आंतररुग्ण विभाग, १०० आयसीयू बेड्स, १७ मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, अत्याधुनिक कॅथलॅब, १० एनआयसीयू आणि पीआयसीयू बेड्स, २४ तास डायलिसिस सुविधा, २४ तास औषधालय सेवा, रुग्णांसाठी जेवणाची मोफत सुविधा, रुग्णांच्या नातेवाइकांची राहण्याची, जेवणाची सोय, आधुनिक सीटी-स्कॅन व एक्स-रे, २४ तास रुग्णवाहिका, २४ तास रक्तपेढी अशा सुविधा उपलब्ध आहेत.

माझ्या पत्नीच्या छातीत पाच वर्षांपासून दुखत होते. नाशिकसह धुळे जिल्ह्यात विविध ठिकाणी तिच्यावर उपचार केले. मात्र, सुधारणा झाली नाही. काही डॉक्टरांनी आम्हाला एसएमबीटी हॉस्पिटलला जाण्याचा सल्ला दिला. यानंतर येथील डॉक्टरांनी तिच्यावर योग्य उपचार करून तिसऱ्याच दिवशी ती व्यवस्थित चालू शकली.

– **विजय बहिरम,** रुग्ण महिलेचे पती

मला दहा दिवसांपूर्वी हार्ट अटॅक आला. डॉक्टरांनी बायपास करण्याचा सल्ला दिला. परिसरातील डॉक्टरांनी एसएमबीटी हॉस्पिटलला उपचार घेण्यास सुचविले. डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी व्यवस्थित समजावले व केवळ एका लहानशा छिद्रातून बायपास सर्जरी यशस्वी झाली. बायपास झाली आहे, असे मला वाटलेही नाही.

– **संजय बैरागी, हांडेवाडी** (ता. कोपरगाव, जि. नगर)

एसएमबीटी हॉस्पिटलच्या हृदयविकार विभागात सध्या मिनिमली इन्वेसिव्ह सर्जरीद्वारे बायपासवर उपचार केले जात आहेत. याठिकाणी जन्मजात हृदयविकारापासून प्रौढांच्या हृदयविकारापर्यंत सर्व आजारांवर उपचार केले जातात.

– **विद्युतकुमार सिन्हा,** हृदयविकार तज्ज्ञ, एसएमबीटी हॉस्पिटल

Nashik Edition
Sep 30, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com



SMBT

# क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रियासांठी 'मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी' नवा पर्याय

## एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आठ वर्षांत २७ हजारपेक्षा अधिक हृदयविकार शस्त्रक्रिया; सर्वसामान्य रुग्णांवर मोफत उपचार

**नाशिक (प्रतिनिधी):-** प्रत्येकाला हृदयासंबंधित आजाराची भीती वाटते, 'मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी ज्याला मिनिमली इनवेसिव्ह प्रोसिजर किंवा मिनिमली इनवेसिव्ह टेक्निकद्वारे शस्त्रक्रिया असेदेखील म्हटले जाते. या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. यामुळे रुग्णांना रुग्णालयातून लवकर डिस्चार्ज मिळतो, वेदना कमी होतात. शिवाय रक्तस्राव कमी आणि इन्फेक्शनदेखील कमी होते. यामुळे रुग्ण बरे होऊन अवघ्या तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी रुग्णालयातून घरी जाऊ शकतात, अशी माहिती तज्ज्ञ डॉक्टरांनी पत्रकार परिषदेत दिली.

काल जागतिक हृदय दिन 'युज हार्ट फॉर एव्हरी हार्ट' अशी यावर्षीची थीम आहे. यानिमित्ताने एसएमबीटी हॉस्पिटलकडून अद्ययावत तंत्रज्ञानाची कास धरून अनेक इनोव्हेशन्स करण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरीबाबत जनजागृती करण्याचा मानस ठेवला आहे. हृदयविकार किंवा बायपास याबाबत अनेक समज गैरसमज आहेत.

मात्र, एसएमबीटी हॉस्पिटलचे हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ हे रुग्णांचा व नातेवाईकांचा विश्वास संपादन करून अशा प्रकारच्या




अनेक शस्त्रक्रियांना मिनिमली इनवेसिव्ह सर्जरीद्वारे अवघड शस्त्रक्रियादेखील यशस्वी करून दाखवत आहेत. एसएमबीटी हॉस्पिटलकडून अद्ययावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण असे ऑपरेशन थिएटर्स साकारण्यात आले आहेत. अतिशय अभ्यासपूर्ण व अचूक उपचार याठिकाणचे अनुभवी हृदयविकार तज्ज्ञ, हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ व हृदयविकार भूल तज्ज्ञ करत आहेत. येथील अनुभवी डॉक्टर्स रुग्णांच्या सेवेसाठी पूर्णवेळ उपलब्ध आहेत. मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी ओपन हार्ट सर्जरीला पर्याय असल्याचे सांगितले जाते. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये हृदयविकारावर मोठे काम सुरु असून प्रशस्त आणि स्वतंत्र हृदयविकार विभाग कार्यरत आहे. हा विभाग एसएमबीटी हार्ट इन्स्टीट्युट नावाने कार्यरत असून हॉस्पिटलच्या सेंटर ऑफ क्लिनिकल एक्सलन्सचा भाग आहे. एसएमबीटी हॉस्पिटलच्या हार्ट इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून आतापर्यंत २७ हजार पेक्षा अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार झाले असून या रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. नवजात बालकांपासून ते अगदी वयोवृद्धांवर हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये उपचार व शस्त्रक्रिया केल्या जात आहेत.

क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रियासांठी 'मिनिमल

**पत्नीची यशस्वी शस्त्रक्रिया-** माझ्या पत्नीच्या छातीत पाच वर्षांपासून दुखत होते. नाशिकसह धुळे जिल्ह्यात विविध ठिकाणी तिच्यावर उपचार केले. मात्र, सुधारणा झाली नाही. तिला व्हॉल्व्हचा त्रास असल्याचे निदर्शनास आले. परिस्थिती बेताची यासोबतच तब्येत आधीच नाजूक त्यात व्हॉल्व्हचा त्रास म्हटल्यावर मोठे टेन्शन होते. यानंतर काही डॉक्टरांनी आम्हाला एसएमबीटी हॉस्पिटलला नेण्याचा सल्ला दिला. यानंतर येथील डॉक्टरांनी तिच्यावर योग्य उपचार करून तिसऱ्याच दिवशी ती व्यवस्थित चालू शकली व व्यवस्थित (पान ६ वर)

### हृदयविकार तज्ज्ञांना दोन तपाचा प्रदीर्घ अनुभव

डॉ. गौरव वर्मा, विभागप्रमुख, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट, डॉ. विद्युतकुमार सिन्हा, विभागप्रमुख हृदयविकार शस्त्रक्रिया विभाग, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट, डॉ. सुरेश पाटील, डॉ पवन सिंग, डॉ महेश अहिरे यांच्यासह मोठा स्टाफ हे एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमधील तज्ज्ञ डॉक्टर्स २४ तास रुग्णसेवा करत आहेत. या तज्ज्ञांचा अनुभव दोन तपाहून अधिक आहे. म्हणून एसएमबीटी हॉस्पिटल योग्य उपचार आणि यशस्वी शस्त्रक्रिया असे समीकरणच बनले आहे. त्यामुळे रुग्णांचा व त्यांच्या नातेवाईकांचा विश्वास अधिकच दृढ बनतो आहे.

देशदूत

SMBT

# ‘मिनिमली इन्वेंसिव्ह सर्जरी’ तंत्राचा वापर

## एसएमबीटीत २७ हजारांहून अधिक हृदयविकार शस्त्रक्रिया

**नाशिक । दि. २९ प्रतिनिधी**

‘मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी (एमआयएस), ज्याला मिनिमली इनवेसिव्ह प्रोसिजर या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. यामुळे रुग्णांना रुग्णालयातून लवकर डिस्चार्ज मिळतो, कमी वेदना व रक्तस्राव आणि कमी इन्फेक्शन यामुळे रुग्ण बरे होऊन अवघ्या दोन - तीन दिवसांत रुग्णालयातून घरी जाऊ शकत असल्याचे पत्रकार परिषदेत डीन डॉ. मीनल मोहगांवकर, हृदयविकार शस्त्रक्रीया तज्ञ डॉ विद्युतकुमार सिन्हा व चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी सांगितले.

जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधत एसएमबीटीकडून मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरीबाबत जनजागृती करण्याचे ठरवले आहे. हृदयविकार किंवा बायपास याबाबत अनेक समज गैरसमज आहेत. मात्र, एसएमबीटी हॉस्पिटलचे हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ञ हे रुग्णांचा व नातेवाईकांचा विश्वास संपादन करून अशा प्रकारच्या अनेक शस्त्रक्रीयांना मिनिमली इनवेसिव्ह सर्जरीद्वारे अवघड असलेल्या शस्त्रक्रियादेखील यशस्वी करून दाखवत आहेत. नव्या तंत्रज्ञानामुळे मोठ-मोठ्या उघडच्या चिरांऐवजी मिनिमली इनवेसिव्ह सर्जरीद्वारे काही मिलिमीटर ते काही सेंटीमीटर आकाराच्या लहान चिरा करून शस्त्रक्रिया होत असल्यामुळे मोठा दिलासा देण्यात एसएमबीटी हॉस्पिटलच्या तज्ञांना यश आल्याचे यावेळी सांगण्यात आले. दुर्बिणीद्वारे हृदयविकार शस्त्रक्रिया आता एसएमबीटीमध्ये पार पडत आहेत. अद्ययावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण असे ऑपरेशन थियेटर्स साकारण्यात आले आहेत.

मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी ओपन हार्ट सर्जरीला पर्याय असल्याचे सांगितले जाते. या टेक्निकनुसार शस्त्रक्रीया करताना शरीराला चिर करून किंवा एका छोट्याश्या छिद्रातून शस्त्रक्रिया होते. एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून आतापर्यंत २७ हजार पेक्षा अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार झाले असून या रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. नवजात बालकांपासून ते अगदी वयोवृद्धांवर हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये उपचार व शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. शासकीय योजनेच्या माध्यमातून दर्जेदार उपचारांबरोबरच शस्त्रक्रिया देखील पूर्णपणे मोफत केल्या जात आहेत.




डॉ. गौरव वर्मा, विभागप्रमुख, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट, डॉ. विद्युतकुमार सिन्हा, विभागप्रमुख हृदयविकार शस्त्रक्रिया विभाग, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट, डॉ. सुरेश पाटील, डॉ पवन सिंग, डॉ महेश आहिरे यांच्यासह मोठा स्टाफ हे एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमधील तज्ज्ञ डॉक्टरर्स २४ तास रुग्णसेवा करत आहेत. या तज्ज्ञांना दोन तपाहून अधिक अनुभव आहे.

एसएमबीटी हार्ट इन्सिट्यूटमध्ये अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास या शस्त्रक्रिया मोफत असून बाह्यरुग्ण तपासणी देखील मोफत आहे. येथे बालहृदयरोग शस्त्रक्रियेत हृदयरोगासंबंधी सर्व प्रकारचे जन्मजात हृदयविकार, बलून शस्त्रक्रिया, हृदयाच्या झडपांची शस्त्रक्रिया, हृदयाचा वाल्व बदलणे अथवा तो दुरूस्त करणे या हृदयविकारावरील शस्त्रक्रियादेखील पूर्णपणे मोफत केल्या जातात.

Deshdoot Edition
Sep 30, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

दिव्य मराठी

नाशिक सिटी 30-09-2023

SMBT

# ‘एसएमबीटी’मध्ये क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रियांसाठी ‘मिनिमली’चा पर्याय

## अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे ३ ते ४ दिवसांत रुग्णांना डिस्चार्ज शक्य

**प्रतिनिधी** | नाशिक

‘मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरी (एमआयएस), अर्थात मिनिमली इन्व्हेसिव्ह प्रोसिजर किंवा मिनिमली इन्व्हेसिव्ह टेक्निकद्वारे एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. यामुळे रुग्णांना लवकर डिस्चार्ज मिळतो, वेदना कमी होतात शिवाय रक्तस्राव कमी, इन्फेक्शनही कमी होते. यामुळे रुग्ण तिसऱ्याच दिवशी रुग्णालयातून घरी जाऊ शकतात. मिनिमली इन्व्हेसिव्ह सर्जरीबाबत रुग्णालयाकडून जनजागृती करण्याचा मानस आहे.

हृदयविकार किंवा बायपास याबाबत अनेक समज-गैरसमज आहेत. शस्त्रक्रिया करावयाची असेल तर छातीवर मोठी चीर पाडावी लागते. रक्तस्राव खूप होतो, म्हणून रुग्ण बरा होईल की नाही असे प्रश्न रुग्णाच्या नातेवाइकांना पडतात. दुसरीकडे मुलगी असेल किंवा तरुण असेल तर त्याच्या शरीरावर कायमचे व्रण दिसतात. मात्र, एसएमबीटीचे हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ ‘मिनिमली इन्व्हेसिव्ह’द्वारे अवघड शस्त्रक्रिया यशस्वी करत आहेत. नव्या तंत्रज्ञानामुळे मोठ-मोठ्या उघड्या चिरांऐवजी काही मिलिमीटर ते सेंटिमीटर आकारात चिर करून शस्त्रक्रिया होत असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

